दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर  वर्ष ४ थे  अंक १४६ वा बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.

# उमेदवार, पोल मॅनेजर्स जागते रहो!
# प्रशासन अलर्ट मोडवर

गेले पंधरा दिवस सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार सोमवारी संपला. मंगळवारचा दिवस बूथ पातळीवर नियोजनात उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते, निवडणूक प्रमुखांनी घालविला. राजकीय पक्षांमार्फत पुरेशी खबरदारी घेत नव्या चेहऱ्यांवर ही जबाबदारी देण्यात आली. बुधवारी सकाळी मतदान सुरू होईल त्यावेळी या सर्वांची कसोटी लागणार आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत अधिकाधिक मतदानाचा टक्का कसा आपल्या बाजूने वळेल यासाठी प्रत्येक जण कामाला लागला आहे.

काटोल येथील घटनेनंतर जिल्ह्यात सावनेर, रामटेक, उमरेड, हिंगणा अशा विविध मतदारसंघात प्रशासन व पोलिस यंत्रणा अधिक अलर्ट मोडवर आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष



पोद्दार यांच्या नेतृत्वात ग्रामीणमध्ये दोन हजार पोलिसांची मदत ग्रामीणमध्ये घेतली जात आहे. शहरात पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांच्या नेतृत्वात यंत्रणा कामाला लागली आहे. आज दुपारनंतर पोलिंग पार्टी आपापल्या कर्तव्यावर रवाना झाल्या. जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघात लढतीचे चित्र जवळपास आता स्पष्ट झाले आहे. काही जागी थेट तर काही जागी मत विभाजनावर विजयी उमेदवाराचे गणित अवलंबून राहणार आहे. मध्य नागपुरात हलबा समाजाच्या हाती भाजप काँग्रेसची मदार आहे. आज रात्रभर प्रमुख उमेदवार त्यांचे पदाधिकारी जागते रहो.. ! भूमिकेतून कामाला लागणार असल्याने प्रशासन देखील अलर्ट मोडवर आहे.

## मतदानाला जाऊ गं

उठा उठा ग लवकर उठा
पहाटे पहाटे लवकर उठा
मतदानाचा उत्सव गं
मतदानाला जाऊ गं

आपलं गं सविधान
आपल्याला गं अभिमान
साऱ्यांना सारखं
एकच मतदान
पवित्र त्याच राखू गं

माणसाला माणूस
म्हणतंग गं संविधान
देशासाठी जगावं
संविधान म्हणत गं
संविधानाने दिले हक्क
हक्क बाजावू गं

नेता आपण निवडू
निर्मल मनाचा
स्वच्छ चारित्र
निःस्वार्थ व्रतीचा
दाबून बटण निवडून देऊ गं

आपला देश
आपली मानस
सुरक्षित राहण्यासाठी
अखंड भारत,लोकशाही
सदैव जिवंत ठेवाण्यासाठी
विश्वसपात्र समाजसेवक
मतदान करून निवडू गं

नागनाथ कलवले, लातूर

## मतदानरुपी राष्ट्रीय कर्तव्य पार पाडा-आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचे आवाहन

निलंगा /प्रतिनिधी :- लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे मतदान होय. लोकशाहीने कोणताही भेदभाव न करता प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. मतदान करणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यामुळेच मतदानरूपी राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे असे आवाहन करून माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मतदान करताना राष्ट्रहित व उज्वल भविष्य याचा विचार करून आपल्या सदसद् विवेक बुध्दीने मतदान करावे, अशी साद मतदारांना घातली आहे.



राज्यात विधानसभेची निवडणूक होऊ घातली असून या निवडणूकीसाठी आज दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणून मतदानाकडे पाहिले जाते. लोकशाही व संविधानाने गरीब-श्रीमंत, जात-पात असा कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाला मतदानाचा समान अधिकार दिलेला आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या या अधिकाराचा योग्य वापर करणे अतिशय गरजेचे असल्याचे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. विधानसभा निवडणुक ही मतदारसंघासह राज्याच्या उज्वल भविष्यासाठी अतिशय महत्वाची आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून संपूर्ण भारत देशाला वेगळी दिशा देणारी ठरणार आहे. त्यामुळेच प्रत्येक नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले. आ. संभाजी पाटीलनिलंगेकर हे आपल्या कुटूंबियांसह दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता औराद शहाजानी येथे आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तरी सर्वांनी आपला मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अवैध देशी दारू साठ्यावर पोलीस ठाणे देवणी ची छापेमारी. ०३ लाख ३९ हजार रुपयांचा देशी दारूचा साठा जप्त..

लातूर :- विधानसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची तीव्रता वाढविण्यात आली असून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सर्व ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक डॉक्टर अजय देवरे उपाय निलंगा नितीन कटेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे देवणी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके यांच्या नेतृत्वातील पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सदर पथकाने मौजे वलांडी शिवारातील एका शेतातील पत्र्याच्या शेडवर छापेमारी केली.

सदर छापीमारीमध्ये आरोपी नामे





१)दत्तात्रय ज्योतीराम दुबे, राहणार वलांडी तालुका देवणी.यांने स्वतःच्या फायद्यासाठी देशी दारूची अवैध विक्री व्यवसाय करण्याकरिता साठवणूक करून ठेवलेले ०३ लाख ३९ हजार ५०० रुपये किमतीचे जवळपास देशी दारूचे १०० बॉक्स जप्त करण्यात आले आहे.

नमूद आरोपी विरुद्ध पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गोंड यांचे फिर्याद वरून पोलीस ठाणे देवणी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात देवणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गोंड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कोडामंगले, पोलीस अंमलदार संजय बोईने, देविदास कीवंडे, योगेश गिरी यांनी केली आहे.

विधानसभा निवडणूक_२०२४ च्या मतपेट्या वाटप केंद्रावर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, लातूर शहर विधानसभा निवडणूक अधिकारी रोहिणी नऱ्हे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख यांनी भेट दिली.
मतपेट्या/ईव्हीएम बुथवर घेऊन जाणाऱ्या वाहनाला हरी झंडी दाखवून मतदान बूथ वरील टीमला शुभेच्छासह रवाना केले.





## घरफोडीच्या गुन्ह्यातील गुन्हेगाराला ०१ लाख रुपयाच्या मुद्देमालासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- घरफोडीच्या गुन्ह्यातील गुन्हेगाराला ०१ लाख रुपयाच्या मुद्देमालासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.*

याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर जिल्ह्यातील औसा पोलीस ठाणे हद्दी मध्ये अज्ञात आरोपींनी रात्रीच्यावेळी मोबाईल दुकानाचे शटर उचकावून आत मध्ये प्रवेश करून काही मोबाईल व रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे औसा येथे अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता .

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता सदर पथकाला त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना आल्या होत्या.

सदर पथकाकडून गुन्ह्या



संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून औसा येथील बस स्थानक ते औसा मूळ जाणारे रोडवरील मोबाईल दुकान फोडून मोबाईल व रोख रकमेची चोरी करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

नमूद चोरीतील गुन्हेगार त्याने चोरलेली मोबाईल विकण्यासाठी लातूर ते औसा जाणारे रोडवर येणार असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीची खातरजमा करून सदरचे पथक तात्काळ नमूद परिसरात सापळा लावून संशयित आरोपीला ताब्यात घेतले.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने सापळा लावून घरफोडीच्या गुन्ह्यातील संशयित आरोपीला दिनांक १६/११/२०२४ रोजी ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव सोनू पिराजी पवार,वय २० वर्ष, राहणार कारखाना रोड मौलाना चौक वसमत जिल्हा हिंगोली.

असे असल्याचे सांगितले.

व त्याच्यासोबत सोबत दोन अल्पवयीन मुले मिळून आली. त्याची झडती घेतली असता त्याच्या पॅन्ट च्या खिशामध्ये त्यांनी चोरी केलेले मोबाईल पैकी पाच मोबाईल व त्यांच्यासोबत असलेल्या बॅगमध्ये ४० हजार रुपये नगदी चे मिळून आले. त्याबाबत त्याच्याकडे विचारले तेव्हा पिराजी पवार त्याने त्याच्या सोबत असलेल्या दोन अल्पवयीन मुल व त्याचा आणखीन एक साथीदारा सोनू भगवान काळे,राहणार विलास-नगर, मरळगाव उल्हासनगर नवी मुंबई याचेसह मिळून औसा शहरातील एक मोबाईल शॉपी फोडून मोबाईल व रोख रक्कम चोरल्याचे कबूल केले व गुन्ह्या मध्ये चोरलेला, त्यांच्या हिश्याला आलेले मोबाईल व रोख रक्कम असल्याचे कबूल केले

त्यावरून नमूद आरोपीस त्याने चोरलेली रोख रक्कम पैकी ४० हजार रुपये नगदी व पाच मोबाईल असा एकूण एक लाख ०१ हजार ३७६ रुपयाचा मुद्देमालासह ताब्यात घेऊन पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे औसा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून मोबाईल दुकान फोडून चोरी करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळून त्यांच्याकडून चोरलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे , खुर्रम काझी, अर्जुन राजपूत, दीनानाथ देवकते, युवराज गिरी, राजेश कंचे, मोहन सुरवसे यांनी केली आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# लष्करी कर्तृत्वाची साक्ष

१९६८-६९ साल इंदिराजींनी स्वतः भारतीय नौसेनेची पाहणी करून नवीन करार-मदार घडवून आणले. विक्रांत या विमानवाहू जंगी जहाजावर स्वतः खोल समुद्रात जातीने आरमारी युद्धाचा अभ्यास करीत अंदमान-निकोबार-मिनीकॉय जवळील छोट्या छोट्या बेटांना भेटी देऊन तेथील जनतेत भारतीयत्वाची जाण आणली. कारण चिनी राज्यकर्ते आपल्या 'टू मेन सबमर्ज बोटस्'मधून या बेटांवर शिरकाव करत होते. हे इंदिराजींच्या चाणाक्ष बुद्धीने हेरले होते.

या त्यांच्या आरमारी मुशाफिरीचा मी स्वतः साक्षीदार असून विक्रांतवरच सेवारत असल्याने त्यांच्या सहवासात चार दिवस राहण्याचे भाग्य मला लाभले. तेव्हा आम्ही इंदिराजींच्या आगमनाप्रीत्यर्थ एक कार्यक्रम फुरसतीच्या वेळात दूरवर खोल समुद्रात पेश करून त्यांना सुखद धक्का दिला होता. कारण जहाज चालू असताना फ्लाईंग डेकच्या मुव्हिंग लिफ्टवर स्टेज बनवून फिरत्या रंगमंचाप्रमाणे सादर केलेला तो करमणुकीचा कार्यक्रम म्हणजे प्रायोगिक रंगभूमीचा लष्करी आविष्कारच होता.

विक्रांतच्या खलबत खान्यात अॅडमिरल नंदा व इतर वरिष्ठ सेनापतींबरोबर चर्चा होऊन भारतीय नौसेनेच्या नूतनीकरणाचा एक कालबद्ध आराखडा तयार करण्यात येऊन त्याच्या अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले. आरमारला सुसज्ज करण्यासाठी रशिया व इतर राष्ट्रांची मदत घेण्याचे ठरले. विशाखापट्टणम मुक्कामी पाणबुडी प्रशिक्षण केंद्र इंडियन नेव्हल शिफ्ट वीरबाहूची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. हा इंदिराजींच्या लष्करी प्रगतीपथावरील महत्त्वाचा टप्पा होता. यातही इंदिराजींचा एक खास राजकीय व लष्करी डाव होता.

अमेरिकेने पाकसारख्या युद्धखोर राष्ट्राला 'गाझी'सारखी शस्त्रसज्ज पाणबुडी बहाल करून शक्तीचा समतोल बिघडवत होती व पाकला गोंजारत होती. तेव्हा या शहास काटशह या न्यायाने आपल्या राजकीय बुद्धीचातुर्यावर इंदिराजींनी तुलनेने जवळ व वेळप्रसंगी चीनला जेरबंद करण्यास उपयुक्त म्हणून रशियाला जवळ केले. रशियन पाणबुड्या, क्रुझर्स हेलिकॉप्टर्स विकत घेऊन अमेरिकेला सुयोग्य प्रत्युत्तर दिले. हे करीत असताना ऑगस्ट १९७० मध्ये रशियाबरोबर त्यांनी वीस वर्षांचा सहकार्य व मैत्रीचा जो महत्त्वपूर्ण करार घडवून आणला त्याने तर पाकिस्तानसकट सर्व जगच स्तंभित होऊन गेले आणि अमेरिकेच्या लष्करी महत्त्वाकांक्षेला लगाम बसला. या कराराची प्रचिती बांगलादेशाच्या संग्रामात आली.

पाकच्या मदतीला सातवे आरमार बंगालच्या उपसागरात उतरत असताना रशियन सैन्य चीनचा संभाव्य हल्ला परतवण्यासाठी तिबेटकडून अक्साई चीनजवळ उभे राहिले. तसेच रशियन आरमारही हिंदुस्थानी आरमाराच्या मदतीसाठी शस्त्रसज्ज होऊन तयार होते. 'प्रहार करत रहा' हा इंदिराजींचा बिनधास्त आदेश मिळताच 'गाझी'ला तर भारतीय आरमाराने पार समुद्राच्या रसातळाला जलसमाधीस्थ करून टाकले. 'हजारो साल लढेंगे' ही पोकळ दर्पोक्ती करणार्या झुल्फिकार अली भुट्टो यांच्या चीन भेटीचे तीन तेरा, नऊ बारा वाजवले.

पश्चिम पाकिस्तानचे नेते पूर्व पाकिस्तानी जनतेचे आर्थिक शोषण करीत होते.

निर्वासितांचे लोंढे भारताला रोजच्या रोज गर्दी करून आर्थिक नाकेबंदी होत होती. तेव्हा नाईलाजाने भारताला पाकच्या या नापाक इराद्याला वेसण घालणे भाग पडले. मार्च १९७१ पासून हे एक प्रकारचे पाकिस्तानने शीतयुद्ध भारताविरुद्ध सुरू केले होते. तेव्हाच भविष्याचा विचार करून सैन्याच्या मदतीने इंदिराजींनी योग्य पावले उचलून वेळीच त्याचा बंदोबस्त केला. सर्व जगाला पटवून देण्यासाठी व संभाव्य आक्रमणाची जाणीव करून देण्यासाठी इंदिराजींनी जनमत संग्रह करून जगाचा प्रवास केला. युद्ध पेटलेच तर त्याचा दोष पाकवरच राहील व त्याने तशी कुरापत काढलीच तर त्याचे चोख प्रत्युत्तर आम्ही देऊ, हे इंदिराजींनी जगाला ठणकावून सांगितले.

जेव्हा यूनोत युद्धबंदी ठराव पुढे आला तेव्हा भारताची रास्त बाजू ध्यानात घेऊन इंग्लंड व फ्रान्स अनुपस्थित राहिले तर रशियाने व्हेटोचा उपयोग करून अमेरिकेचे मनसुबे धुळीला मिळविले. हा इंदिराजींच्या मुत्सद्दी, लढाऊ प्रेरणेचा विजय होता हे निश्चित. भारतीय आरमाराने स्वावलंबी व्हावे म्हणून लियंडर क्लास फ्रिगेटची निर्मिती करणारा प्रकल्प महत्त्वाचा आहे. यात ८० टक्के भारतीय बनावटीच्या बोटी माझगाव गोदीत तयार होऊन १९७० ते १९८० या दशकात आरमाराच्या जंगी ताफ्यात रूजू झाल्या.

या बोटींवर सरफेस टू सरफेस अँटी-एअर क्राफ्ट या गगनभेदी तोफा व आधुनिक रडार यंत्रणा वापरण्यात आली असून, एक हेलिकॉप्टरही ठेवण्याची सोय आहे. याचा अर्थ युद्धसामग्री उत्पादनांचे देशी बनावटीचे कारखाने उभे करण्याचे तंत्रज्ञान शोधून इंदिराजींनी आपल्या सेनादलांना स्वालंबी व शक्तिशाली बनविले व रोजगाराच्या संधीही उपलब्ध केल्या. यामुळेच आज न्यूक्लिअर सबमरीन बांधण्याचे प्रयत्न भारत करू शकत आहे. याशिवाय पूश बटण वॉर थेअरीच्या या युगात भारतही मागे राहू नये म्हणून इंदिराजींनी स्कायलार्क मिसाइल सेंटरही उभारण्याचा आदेश देऊन तो अमलात आणला, जे त्यांच्या लष्करी कर्तृत्वाची आज साक्ष देत उभे आहे.

भूदल सेनेला जर आधुनिक युद्धतंत्रात शत्रू प्रदेशात मुसंडी मारावयाची असेल, तर नभांगणातही एअर कव्हरेज बलशाली असणे महत्त्वाचे आहे हे ओळखून इंदिराजींनी एच.ए.एल. या कारखान्याचे आधुनिकीकरण केले व मिग, जॅगरनॉट ही गगनभेदी विमाने संपादून वायुसेनेची फेरजुळणी केली. त्यांच्या लष्करी नेतृत्वाचा एक पैलू म्हणजे त्यांनी बेमालूमपणे न डगमगता जाहीर केलेला एक्सक्लुझिव्ह इकॉनॉमिक झोनचा सागरी कायदा. या कायद्यानुसार परकीय जहाजांना भारतीय जलसीमेच्या चाळीस मैल सागरी अंतरात स्वैराचारास बंधन व मासेमारी तत्सम सागरी उद्योगांवर बंदी तसेच समुद्रात सापडणार्या तेलाच्या साठ्यांचे संरक्षण हाही मुख्य उद्देश होता.

# पारडं जड कोणाचं




कल्याण लोकसभा मतदारसंघाने आजवर अनेक मोठमोठाले नेते दिले; परंतु या भागाचा विकास विकासकाने केला असला तरीही इथली नेतेमंडळी पाण्याचे दुर्भिक्ष अद्यापही पूर्णपणे दूर करू शकली नाही. वाहतूककोंडीची समस्या ही येथे कोणत्याही क्षणी उग्र रूप धारण करेल अशी बनली आहे.

ठाणे शहराला लागून असलेला मतदारसंघ मुंब्रा-कळवा. बिल्डरांचा विळखा पडलेल्या या ठाण्याच्या उपनगरात पाण्यापासून वाण्यापर्यंतच्या रोजच्या समस्या आहेत. इथे कुणाचाही पायपोस कुणाच्यातही नाही. जो तो पेंईंग गेस्ट असल्यासारखा इथे येतो व जातो. त्यामुळे येथील विकासाला तेवढ्याच प्रमाणात खीळ बसली आहे असे म्हटले तर वावगे ठरणारे नाही. परिणामी लोकप्रतिनिधींना फारसा त्रासदायक ठरणारा हा मतदारसंघ आहे असेही म्हणता येऊ शकेल.

नाही म्हणायला मुंब्र्याचा भाग जोडला गेल्यामुळे पोलिसांना २४ तास सतर्क ठेवणारा हा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड हे प्रस्थ बनले आहे. आव्हाडांनीसुद्धा इथे भाजप व अखंड शिवसेनेशी टक्कर देताना सामाजिक कार्य भरपूर केले. या विधानसभा निवडणुकीत त्यांना त्यांचे पट्टशिष्य नजीब मुल्ला यांना अजित पवारांच्या राष्ट्रवादीतर्फे उमेदवारी देत आव्हान दिले आहे.

डोंबिवली मतदार विधानसभा संघ हा भाजपचा. इथे साजरी होणारी श्रावणातली मंगळागौर असो वा गुढीपाडवा ते पाहायला परदेशी पर्यटक येतात. गढूळ पाणी हा इथल्या रहिवाशांना आजारपण देणारा पाहुणा. गृहसंकुलांपेक्षा नियम कायदे दुर्लक्षून येथे उभारलेली बांधकामे, चिंचोळे रस्ते, फेरीवाल्यांनी अडवलेले रस्ते, दुकानदारांनी अतिक्रमण केलेले रस्ते हे महानगरपालिकेचे वैशिष्ट्य. इथला विकास होणे हे पुढील वीस वर्षे तरी अपेक्षित नसल्याचे महानगरपालिकेच्या अधिकार्यांना वाटते.

अथक प्रयत्नांनी रवींद्र चव्हाणांसारख्या लोकप्रतिनिधींनी साथ दिल्यामुळे डोंबिवली पूर्व पश्चिम भाग जोडणारा ब्रीज बारा वर्षांनी बनू शकला. परंतु आजवर सर्व घरात मनपाची जलवाहिनी काही पोचू शकली नाही. महानगरपालिकेतील हा विषय मंत्रालयात नेऊन सोडवायला लागतो. याहून डोंबिवलीकरांचे दुसरे दुर्दैव नाही. रवींद्र चव्हाण राजकीयदृष्ट्या सक्षम असूनही उबाठा शिवसेनेच्या दीपेश म्हात्रे यांनी आव्हान दिले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून आयात केलेला म्हात्रे हा शिवसेनेत मानाचे स्थान मिळवू शकला नाही. शिंदेंनी बंड केले नसते तर अद्यापही त्यांना शाखा स्तरावरच वावरावे लागले असते. परंतु विधानसभा निवडणुकीत उभे राहिल्याने त्यांचा चेहरा चार लोकांच्या ओळखीचा झाला इतकाच त्यांचा फायदा. ही लढत दुरंगी आहे असं वाटत असले तरी चव्हाण यांनी आधीच बाजी मारली असेही येथे बोलले जाते.

कल्याण पूर्व लोकसभा मतदारसंघ रस्त्यांची वानवा असलेला. कोणताही शहरी भागाचा चेहरामोहरा नसलेला हा मतदारसंघ अद्यापही पूर्ण विकसित झालेला नाही. विविध आजाराचे रोग घेऊन चाललेला व अजूनही कोकणवासीयांचे प्राबल्य दाखविणारा म्हणून ओळखला जातो. शाळा, महाविद्यालय आणि रुग्णालय यांत प्राथमिक सुविधांचा कायम अभावच. अशा या मतदारसंघात सुषमा गायकवाड यांना उबाठाचे धनंजय बोंडारें यांनी आव्हान दिले आहे.

कल्याण ग्रामीण मतदारसंघात अखंड शिवसेनेचे कार्य भरपूर. परंतु आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना व उद्धव ठाकरे यांची शिवसेना असे दोन गट निर्माण झाल्यामुळे ही दुरंगी लढत चुरशीची होणार असल्याची लक्षणे आहेत. शिंदे सेनेच्या राजेश मोरेंना उद्धव ठाकरेंच्या सुभाष भोईर यांनी आव्हान दिले आहे. अर्थात भोईरांना हरवणे हे मोरेंना तितकेसे सोपे नाही.

निकराने सामना करावा लागणार असल्याचे ते ओळखून आहेत म्हणूनच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ते रोज संपर्कात आहेत. मनसेचे राजू पाटील यांनीही तेथून उमेदवारी अर्ज दाखल करून राज ठाकरेंची सभा आपल्या मतदारसंघात घेतली. त्यामुळे या मतदारसंघातून मनसेच्या अशा पल्लवित झाल्या आहेत.

मोठ्या प्रमाणात अनधिकृत दाटीवाटी झालेले शहर उल्हासनगर. माजी आमदार पप्पू कलानींचे वास्तव्य म्हणूनही उल्हासनगरची ओळख आहे. अशा या विधानसभा मतदारसंघात दुरंगी लढत होणार आहे पण ती शांतपणे होते की हिंसक घटनांना स्थान देते हे यावेळी पाहण्यासारखे आहे. भाजपाचे कुमार आयलानी येथून निवडणूक लढवत आहेत. आयलानींचे कार्य मोठे आहे. भाजप कार्यकर्त्यांकडून त्यांना साथही मिळेल.

परंतु मोठ्या प्रमाणावर येथे राहणार्या सिंधी समाजाचा कल हा शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार बोमी कलानी यांच्या बाजूने आहे. या बोमींना शरद पवारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेकडून आयात केले आहे. शिंदेंच्या शिवसेनेतील उठावाच्या वेळेपासून बोमींनी त्यांना साथ दिली होती. वंचित व मनसेने इथे उमेदवार दिला आहे. पण त्यांच्याकडून मतांची फोडाफोडी होण्याव्यतिरिक्त बाकी काही चमत्कार घडू शकेल अशी शक्यता नाही.

अंबरनाथ मतदारसंघ हा नेहमीच महायुतीच्या बाजूने राहिला आहे. अखंड शिवसेनेचा हा बालेकिल्लाच म्हणायला हवा. दुरंगी व तिरंगी लढत इथे अपेक्षित नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खास समजले जाणारे बालाजी किणीकर यांनी येथून शिंदेसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

त्यांच्यासाठी मुख्यमंत्र्यांनी उमेदवारी देताना जशी प्रतिष्ठा पणाला लावली तशीच निवडणुकीतही त्यांना निवडून आणण्यासाठी लावण्याची शक्यता येथे नाकारली जात नाही. किणीकर हे शिंदे याच्या बंडापासून त्यांच्यासोबत होते. त्यामुळे अंबरनाथची उमेदवारी ही त्यांना आमदारकी मिळणार म्हणूनच दिली गेल्याचे बोलले जाते. किणीकरांना उबाठा शिवसेनेच्या राजेश वानखेडे यांनी आव्हान दिले आहे.

# किती आश्वासनांचा फायदा ते लवकरच कळेल



महाराष्ट्र विधानसभेच्या प्रचाराची रणधुमाळी संपली. सामान्य माणसांची बुद्धी भ्रमिष्ट व्हावी अशा स्वरूपाची या निवडणुकीत प्रचाराची पातळी राहिली. या प्रचाराला प्रसिद्धी देताना टीव्ही मीडियाच्या लोकांनी वेगळीच तर्हा अवलंबली. त्यातून लोकांमध्ये आणखीनच संभ्रमावस्था निर्माण झाली. कुठल्याही निवडणुकीचा विशेषतः महाराष्ट्रासारख्या प्रगल्भ आणि पुरोगामी विचारांच्या राज्यातील निवडणुकीचा प्रचार यापूर्वी कधीच इतक्या हीन पातळीवर गेलेला पाहायला मिळाला नाही. या प्रचाराच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या मुलाखतीचेही कार्यक्रम टीव्हीवर झाले. त्यात तर काही महाभाग असे म्हणताना आढळले आहेत की, आता निवडणूक तत्त्वाबित्वावर राहिलेली नाही, आता केवळ आपली राजकीय सोय बघणे यालाच अधिक महत्त्व आहे.

राजकीय धोरण, तत्त्व आणि लोकांच्या मुद्द्यांचे विषय हा सगळा इतिहास झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात सगळ्याच राजकीय पक्षांनी तत्त्वांना मुरड घातली. भारतीय जनता पक्षाचा प्रचार पाहिल्यानंतर त्यांनी बाहेरचे नेते या राज्यात आणून या राज्यातील सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न केला, असा ठोस आरोप त्यांच्यावर केला गेला. सतत प्रत्येक दिवशी 'बटेंगे तो कटेंगे' किंवा 'एक है तो सेफ है', असे नारे दिले गेले. पण यात एक गोष्ट बरी झाली की, महाराष्ट्रातील भाजपच्याच नेत्यांनी आणि त्यांच्या युतीतील अन्य राजकीय पक्षांच्या नेत्यांनी महाराष्ट्रात असला 'बटेंगे तो कटेंगे'चा प्रचार चालणार नाही असा स्पष्ट इशारा दिला.

या नेत्यांमध्ये पंकजा मुंडे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण यांचा समावेश होता. यावर फडणवीस यांना जेव्हा प्रश्न विचारला गेला त्यावर त्यांनी असे मासलेवाईक उत्तर दिले की, या घोषणेचा अर्थच काही लोकांना नीट समजला नसावा. खुद्द फडणवीस यांनीही वोट जिहाद मौलवींनी दिलेले निवेदन, अन्य मुस्लीम नेत्यांच्या भाषणाचे संदर्भ देऊन धार्मिक विद्वेषाच्या आगीत तेल ओतण्याचे काम केले. ज्या नेत्यावर गृहमंत्री या नात्याने राज्यातील धार्मिक सलोखा आणि सद्भावनेचे वातावरण कायम ठेवणे ही जबाबदारी आहे त्या नेत्यानेच अशी विधाने करणे दुर्दैवी.

वास्तविक राज्यातून बाहेर गेलेले उद्योग, शेतकर्यांच्या मालाला मिळत नसलेला भाव, त्यांच्या वाढत्या आत्महत्या, बेरोजगारीचा वाढता दर, रस्ते आणि अन्य पायाभूत सुविधांची दुर्दशा, राज्य सरकारची थकलेली देणी असे सगळे महत्त्वाचे प्रश्न असताना त्यावर कोणी काही भाष्य करताना दिसले नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विशेषतः शरद पवार, मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी या नेत्यांनी आपले मुद्दे शेवटपर्यंत लावून धरले. दिशा भरकटण्याचा जो प्रयत्न भाजपकडून झाला त्या डावावर ते गेलेले दिसले नाहीत.

त्यांनी त्यांचा अजेंडा लोकांपुढे नीट रेटला. 'बटेंगे तो कटेंगे' या विषयावर जेव्हा महाविकास आघाडीच्या नेत्यांना ठिकठिकाणी पत्रकार परिषदेत बोलते करण्याचा प्रयत्न केला गेला, त्यावेळी त्यांनी अशा घोषणांऐवजी, 'पढेंगे तो बढेंगे' या घोषणेवर आमचा विश्वास असल्याचे नमूद केले. राहुल गांधी यांनी शेवटच्या दिवशी एक पत्रकार परिषद घेऊन धारावीतील एक लाख कोटी रुपये किमतीची जमीन कशी अदानींच्या घशात घातली जात आहे या मुद्द्याचे भांडवल करीत मांडणी केली.

महाराष्ट्रातील संपत्ती आणि पायाभूत सुविधा अदानी यांनाच देण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जात असून, त्यासाठी त्यांना ही निवडणूक जिंकायची आहे असा दावा त्यांनी केला. या निवडणुकीत एकूणच अदानी हा विषय खूप गाजला. अर्थात त्याला महायुतीतले नेते अजित पवार हेच प्रामुख्याने कारणीभूत ठरले. कारण त्यांनी शरद पवार यांना पहाटेच्या शपथविधीच्या प्रकरणात अडकवण्याच्या नादात, त्यावेळी ज्या चर्चा झाल्या त्या चर्चेला शरद पवार यांच्या सोबतच गौतम अदानी उपस्थित होते असा दावा केला आणि पुढे हा विषय शेवटपर्यंत गाजत राहिला.

इंडिया आघाडीच्या नेत्यांनी राष्ट्रीय पातळीवरून याचे भांडवल केले. पण त्याला ठोस आणि परिणामकारक उत्तर देण्याऐवजी भाजपच्या नेत्यांकडून 'बटेंगे तो कटेंगे' चालूच राहिले. महाराष्ट्राची निवडणूक यावेळी प्रथमच दक्षिण भारतातील एखाद्या राज्याच्या निवडणूक प्रचार शैलीत लढवली गेल्याचे दिसले. दक्षिण भारतात जसे निवडणुकीच्या काळात मोफत योजनांचे पेव फुटते तसे पेव यावेळी महाराष्ट्रात पहिल्यांदाच फुटले होते. लाडक्या बहिणींना दरमहा पंधराशे रुपये दिले जात असल्याने, त्याला प्रत्युत्तर म्हणून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आधी ही रक्कम पंचवीसशे रुपये आणि नंतर ती तीन हजार रुपयांपर्यंत वाढवली.

मग महायुतीचे नेतेही पुढे सरसावले आणि त्यांनी पंधराशे रुपयांची रक्कम वाढवून आम्ही दरमहा २१०० रुपये देऊ अशी घोषणा केली. पुढील पाच वर्षांत अमुक इतके लाख रोजगार देऊ, वृद्धांना आणि बेरोजगारांना अमुक इतका दरमहा आर्थिक मदतीचा हात देऊ, अशा घोषणा दोन्ही बाजूंकडून झाल्या. शेतकर्यांच्या मालाच्या हमी भावाबाबत भाजपचे लोक फार बोलताना दिसले नाहीत, पण काँग्रेसच्या नेत्यांनी मात्र सध्या घायकुतीला आलेल्या सोयाबीन उत्पादकांना सात हजार रुपये प्रति क्विंटल इतका दर देण्याची हमी दिली आहे.

सध्या सोयाबीन उत्पादकांना जेमतेम साडेतीन ते चार हजार रुपये प्रति क्विंटल इतका भाव मिळतो. त्यातून त्यांचा उत्पादन खर्चसुद्धा भागत नाही. आता त्यांना महाविकास आघाडीने सात हजार रुपये प्रति क्विंटल अशा भावाचे आश्वासन दिले आहे. त्यावर मात्र महायुतीच्या लोकांनी गप्प बसणेच पसंत केलेले दिसले. या राज्यात एक मुद्दा विरोधी पक्षांकडून सातत्याने मांडला गेला तो म्हणजे महिलांची सुरक्षा. त्यावरही दोन्ही बाजूंकडून काही थातूरमातूर योजना आणि आश्वासने दिली गेली आहेत. निवडणुकीनंतर यातली कोणती आश्वासने लोकांच्या पदरात पडतील हे पाहण्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागेल.

# शाळाबाहेरील शाळा व जॉर्ज बर्नार्ड शॉ

**जगात अनेक महान माणसं कधीच शाळेत गेली नाहीत.बहुतेकांचे शिक्षण हे शाळा सोडल्यानंतर झाले.शाळा हे जरी संस्कार व गुणविकासाचे केंद्र असले तरीही ते अंतिम केंद्र नाही.शाळाबाहेरील शाळा हेच अंतिम सर्वंकष विकासाचे केंद्र असल्याचे दिसते. एडिसन,रविंद्रनाथ टागोर,जॉर्ज बर्नार्ड शॉ या महान लोकांना शाळा बाहेरील शाळा खूप आवडली.त्यांनी जीवनाचे अंतिम तत्त्वज्ञान सांगणारी संकल्पना शाळेच्या बाहेर राहून मांडली.शाळेच्या प्रयोगशाळेत मर्यादित रसायनं व साधनं उपलब्ध आहेत. शाळेच्या ग्रंथालयात मर्यादित प्रमाणात पुस्तके,ग्रंथ उपलब्ध आहेत.पण निसर्गात तशी मर्यादा नाही.मानवाच्या असामान्य बुद्धिमत्तेच्या शेकडोपट जास्त या निळ्या आकाशाखाली व सतत फैलत जात असलेल्या या ब्रम्हांडात करोडो गोष्टी सतत शिकण्यासारख्या आहेत.**

**आज मी तुम्हाला जॉर्ज बर्नार्ड शॉ बद्दल थोडं सांगणार आहे.शॉ ला विनोदबुद्धी वडिलांकडून लाभली तर संगीताची आवड आईकडून लागली. शाळेत त्याचे गणित कच्चे होते.पण त्याचा स्वयंशिक्षण व स्वाध्यायावर जोर होता.त्याने आयुष्यात जे काही केले त्याचा त्याने स्वतंत्र विचार केला.समाजवादाचा आद्य पुरस्कर्ता हाइंडमन याने डेमोक्रॅटिक फेडरेशन ही संस्था स्थापन केली.शॉ त्या संस्थेचा सभासद होता. शॉ ने इंग्लंड या देशाचे आयुष्यभर गोडवे गायले. शॉ ला त्याच्या विनोदबुद्धीमुळे,लेखनामुळे, वक्तृत्वामुळे अनेक मित्र-मैत्रिणी लाभल्या. त्यात जेनी पॅटरसन,दुसरी फ्लारेन्स,विदुषी बेझंट ह्या होत्या.हिटलरचे माईन काफ त्याला खूप आवडे.शॉ ने इंग्लंडमध्ये राहून इंग्लंडच्या विरोधात लेखन केले.परंतू ते इंग्लंडने सहन केले,असे तो म्हणत असे.शॉ म्हणायचा विश्वाच्या मुळाशी एक चैतन्यशक्ती (ङळषश ङ्रेलश) आहे व याचा सखोल विचार करायला हवा.शॉ ने जवळपास १५-१६ क्षेत्रात नाव कमावले.साहित्यसमीक्षक,कलासमीक्षक, संगीतसमीक्षक,नाट्यसमीक्षक,नाटककार, कादंबरीकार,अर्थशास्त्रज्ञ,कवी शेलीप्रमाणे नास्तिक,फेबियन सोशलिस्ट,प्रवचनकार, तत्त्वज्ञ व १९३१ नंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट इ.जगाला शॉ ची प्रमुख ओळख एक नाटककार म्हणून आहे.त्याने ५४ नाटके लिहिली.शेक्सपियरनंतर उत्तम ऐतिहासिक नाटक लिहिणारा शॉ हा एकमेव नाटककार ठरला.*वुइडोअर्स हाऊसिस हे शॉ चे पहिले नाटक.या नाटकात शॉ ने मध्यमवर्गीय लोकांच्या आत्मप्रतिष्ठेच्या भावना चित्रित केल्या.द फिलँडरर हे चार अंकी नाटक शॉ ने १८९३ मध्ये लिहून पूर्ण केले.यात विवाहसंस्थेतील हास्यास्पदता दाखवणे हा विषय होता.मिसेस वॉरन्स प्रोफेशन, कँडिडा,सीझर अँन्ड क्लिओपात्रा,डॉक्टर्स डायलेमा,गेटिंग मॅरिड,सेंट जोन अशी एकाहून एक सरस नाटके शॉ च्या नावावर आहेत.**

**शॉ एका ठिकाणी म्हणाला होता,लोकशाही देशात शिकले सवरलेले लोकही आपला योग्य प्रतिनिधी निवडू शकत नाहीत व जी राजकारणात पडतात ती माणसं चांगलं राजकारण करु शकत नाहीत हा जगाचा अनुभव आहे.याचा परिणाम असा की,सुमार बुध्दीची माणसं पुढंपुढं करतांना दिसतात.**

-------------

**रा.ग.सोनुने,**
**८८८८४२०६२९,बुलढाणा**

चावतो

त्याच्या

तोंडात

बोट

घालण्याची हिंम्मत करीत नाहीत लोक.

पण

चावत

नाही

त्याच्या

तोंडात

अख्खा हात घालतात.

अस का होत ?

मी यावर खूप विचार केला. खूप विचार केल्यावर अस लक्षात आल की जे वाईट प्रवृत्तीचे लोक असतात त्यांना माहीत असत की आपल्याला अडथळा आहे तो नैतिक चांगल्या लोकांचा. आणि चांगले लोक खूप कमी असतात समाजात. वाईट लोक आणि चांगले लोक यांच्या मध्ये जे मधले लोक असतात, भ्याड,नपुसंक,मंदबुध्दी, लालची , लाचार . त्यांची संख्या खूप मोठी आहे. खूप मोठी. मग हे लाचार भ्याड लोक चांगल्या लोकांच्या आडवे येतात. कारण वाईट लोकांच्या तोंडात बोट घालण्याची यांच्यात हिंम्मत नसते. आणि चांगल्या लोकां सोबत चालण्याचीही. वाईट लोकांना असेच लोक हवे असतात. हे लाचार लोक फेकलेल्या तुकड्यांवर जगण्यात आनंद मानणारे लोक असतात.

भारत देशात अशा गुलामांची संख्या अफाट आहे. म्हणून भारत गुलामांचा देश म्हणून मान्यता पावलेला देश आहे. आणि सर्वात आश्चर्य म्हणजे भारतीय लाचार लोक आम्ही गुलाम आहोत हे गर्वान सांगतात. गर्वसे कहो हम - - - है !असा नारा देतात.

गुलाम या शब्दाचा अर्थ मराठी, इंग्रजी शब्दकोषात पहा. मग कळेल की आम्ही मान्य केलेल आहे की आम्ही गुलाम आहोत.

आज देशाची अवस्था पाहीली तर फार भयानक अराजकतेकडे देश चाललेला आहे हे सिध्द होत आहे. बुध्द, शिवराय , फुले , शाहू , आंबेडकरी मानतावादी विचारसरणी गाडून टाकणारी प्रवृत्ती बळावताना दिसत आहे. या देशात कुणबी, कुंभार, कोळी, माळी, सुतार , मांग, चांभार अशा जितीचे लोक , पुरुष , महिला डाक्टर, वकील, कलेक्टर, आयपीएस, आयएएस, प्रधान मंत्री, राष्ट्रपती होण्याची संधी देणा-या जगतश्रेष्ठ संविधानाला संपवण्याची भाषा उघड उघड केली जात आहे. नुसती भाषाच केली जात नाही तर संविधान एकदाच संपवता येणार नाही म्हणून ते हळू हळू कुरतडल जात आहे. खाऊजा धोरण त्याच साठी आहे. सरकारी क्षेत्राच खाजगीकरण करून आरक्षण संपल्यात जमा आहे. सरकारी शाळा बंद केल्याजात आहेत. सगळे उद्योग ठराविक भांडवलदारांना विकून देश त्यांच्या ताब्यात दिला जात आहे.

पुढच यांच शैक्षणिक धोरण तर खूप भयावह आहे. या शैक्षणिक धोरणामुळ ब्राम्हणा व्यतिरिक्त कुणाचच लेकरू डाक्टर, वकील, कलेक्टर बनणार नाही. पैसा असला तरी. कारण दहावी पर्यंतच शिक्षण कामन असणार आहे. आणि दहावी नंतरच शिक्षण जाती प्रमाण मिळणार आहे. कुंभाराच्या मुलांनी कुंभारकीच उच्च शिक्षण घ्यायच. बेलदारान दगड फोडायच उच्च शिक्षण घ्यायच. कुणब्यान शेतकामाच उच्च शिक्षण घ्यायच. याचा अर्थ पुन्हा देश जातीच्या कोंडवाड्यात बंदीस्त होणार. एकीकडे म्हणायच बटोगे तो कटोगे. आणि दुसरीकडे संविधानान एकवटलेल्या जनतेचे तुकडे तुकडे करायचे.

या भयानक परिस्थितीच गांभीर्य फेकलेल्या तुकड्यांवर जगणा-यांना जराही नाही. ते जगत आहेत देश लुटणारांचे आणि संविधान संपवणारांचे तळवे चाटून. पुढच्या पिढ्यांना पुन्हा गुलाम बनऊन.

संविधानामुळ भारत हा गुलामांचा देश आहे हा कलंक पुसला गेला असता. जर संविधान सुरक्षित ठेवता आले असते तर.परंतु गाढवाला गुळाची चव काय या म्हणी प्रमाण गुलामांना स्वातंत्र्याची चव काय कळणार !

पुन्हा भारत देश तन मन धनान गुलाम होणार अशीच परिस्थिती दिसत आहे.

मला आश्चर्य याच वाटत की किमान बौध्द समाजान तरी बा भीमान निर्माण केलेल्या स्वाभिमानाची लाज राखली पाहिजे होती. पण ते ही जातीयवादी, संविधान विरोधी लोकांचे , नेत्यांचे तळवे चाटत आहेत !

खुल्लम खुल्ला प्रचार करीत आहेत. गुलामी दिमाखान मिरवत आहेत. फेकलेल्या तुकड्यांसाठी. आजच्या सुखासाठी पुढच्या हजारो पिढ्यांची गुलामी निर्माण करायला बळ देत आहेत. बाबासाहेब म्हणाले होते, अरे असल्या लाचार जगण्याला जगण म्हणत असाल तर जगा खुशाल. मी सन्मानान मरायला बौध्दधम्माकडे जात आहे. या स्वाभिमानी संदेशाचा अर्थच आमच्या लुत लागलेल्या लाचार बौध्दांना कळला नाही . शंभर दिवस शेळी होऊन जगण्या पेक्षा एक दिवस जगा पण वाघासारख जगा . आम्ही वाघासारख सोडा, शेळीसारखही जगत नाही आहोत. आम्ही लुत लागलेल्या कुत्र्या सारखे जगत आहोत. शेळीला कापून तरी खातात. पण लुतलागलेल्या कुत्र्याची काय अवस्था असते. ती अवस्था लिहीत नाही. समजनेवालेको इशारा काफी.

आम्हाला बा भीमान नितीचा धम्म दिला. स्वाभिमानान सजगण्याचा धम्म दिला. समता, करुणा, प्रज्ञा शील , करुणेचा धम्म दिला. लाचार गुलामगिरीत तळवे चाटण्याचा नाही.

आम्हाला जाणच नाही बा भीमाच्या त्यागाची !

आमची सवयच जात नाही भीक मागाची !

आम्ही नावाला बौध्दा झालो फक्त !

बा भीमाशी बेईमान अन आम्ही आमच्या वै-यांचे निष्ठावान भक्त !

आम्हाला नाही बापान केलेल्या उपकारांची जाण !

आमच्या घशाखाली घासच उतरत नाही हुंगल्या शिवाय उकीरड्यावरची घाण !

आम्ही देशाच्या दुश्मनांच्या आडवे नाही जात ना केसालाही धक्का लावत !

आम्ही त्यांचेच दात मोजतो जे कुणाला कधीच नाही चावत !

सज्ञनांनाच देतो त्रास पार त्यांच्या घशात घालून हात !

कारण गुलामी हीच आमची औकात !

गुलामी हीच औकात !

---------------------------

वसंत कासारे.

(८०८७४८०२२१)

# एक मत परिवर्तन घडवू शकते.

देशात ९३ टक्के असंघटीत कामगार मजूर आहेत.ती सर्व बहुजन,मागासवर्गीय आहेत आणि सात टक्के संघटीत कामगार मजूर आहेत.ते शिक्षणात आरक्षण मिळाल्यामुळे उच्च शिक्षित झाले. त्यामुळे त्यांना नोकरीत पण आरक्षण मिळाले. त्यामुळेच ते आर्थिकदृष्ट्या उच्च वर्गीय होऊन ब्लॉक मध्ये लॉक झाले.यांच्यावर साडेतीन टक्के लोक संख्या असणाऱ्या समाजाची लोक सर्व बाजूने सर्व क्षेत्रात अधिकार गाजवितात.माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नव्हता तेव्हा मताचा अधिकार कसा असणार?.आज माणूस म्हणून जगण्याचा आणि मतदानाचा अधिकार आहे.तरी शेणातील किडे शेणात राहणे पंसद करतात असे खेदाने म्हणावे लिहावे लागते.कारण काही माणस असणारी किड्या सारखी आजही जगतात.त्यांना मताची किंमत कळत नाही.असे कसे म्हणता येईल?. पोटासाठी देह विक्री करनारी वेश्या.आणि पैशासाठी 'मत' विकणारा भ्रष्ट मतदार यात तुलना करणे म्हणजे वेश्येचाच अपमान ठरेल,कारण ती दररोज शरीर विकुन पोट भरते,पण स्वाभिमान,आत्मा विकत नाही.दारू,बिर्यानी,पैसा करीता मत विकनारा मतदार मात्र आपले सर्वस्व स्वाभिमान, आत्मा व सन्मान विकुन कायम लाचार बानतो स्वताही आणि समाजालाही लाचार ठरवतो.

विज्ञानाने खुप प्रगती केली,आता चोरून लपवून कोणते ही काम,व्यवहार केला तर तो उजेडात येण्या करीता चॅनल,प्रिंट मिडियाची गरज नाही.सोशल मिडिया काही तासात त्याला सार्वजनिक करून टाकते. म्हणुनच लोकसभा निवडणुकी नंतर विधानसभा निवडणूका लक्ष्य २०२४ ने अनेक रस्ते,चौक,वार्ड,विभाग सोशल मिडीया ग्रुपने रंगु लागलेत. लोकशाही ने सामान्य माणसाच्या हातात परिवर्तनाच मोठं अस्त्र दिलं.पण त्या अस्त्राचच वस्त्रहरण होत आहे.गल्ली बोळातल्या मतांवर हक्क सांगणारी 'टोळकी' ईच्छुकांच्या दरवाजावर दस्तक देत फिरू लागलीत.या स्पर्धेत कुणीच मागे नाही. त्यात राजकीय मान्यता प्राप्त पक्षाची युती, आघाडी तुटल्या मुळे राजकारणातील घरांण्याची प्रतिष्ठा पणाला लागली. त्यामुळे झोपडपट्ट्यामध्ये पैसे,देवदर्शन,साड्यावाटप, दारूच्या मटनाच्या पार्ट्या,मध्यमवर्गीयांच्या सोसायट्यांमधे ब्लॉक,फरशा,रंगकाम, हलदी कुंकु,होम मिनीस्टर..उच्च मध्यमवर्गीयांना व श्रीमंतांना 'मानपान', गळाभेट, मंडळांना वर्गण्या,गणपतीला चांदी,सोने,मंदीराला कळस,असं बरच काही दान धर्मात मिळत आहे.कारण डोळ्या समोर फक्त निवडणुका आहेत,त्यातला सर्वात मोठा करोडपती हा फाटक गरीब मतदार आहे,त्यांचे एक मत ही सर्व समीकरण बदलू शकते,म्हणुन त्यांना सांबाळणारा कार्यकर्ता म्हणून आलेल्या टोळक्यांना दोन पाच हजार रुपये देऊन खुश ठेवावे लागते,हीच तर खरी लोकशाहीची थट्टा,विटंबना आहे,उमेदवारांच्या खैरातीवर जोगवा मागणारा भ्रष्ट मतदार!,देशाचा खरा गद्दार झाला आहे. त्यांचा लाचारी मुळे नालायक,भष्ट्र,चरित्रहीन लायक बनून लोकप्रिय लोकप्रतिनिधि बनत आहेत.

आपण नेहमी अतिरेक्यांना का दोष देता.त्यांना हा देश संपवायचाय तो स्वतःच्या जीवाचे 'बलीदान' देऊन. आणि तुम्ही तो संपवताय,आणि तेही स्वतःच्या स्वार्थासाठी, व्यक्तिगत फायद्यासाठी?.अतिरेकी तुमच्या पेक्षा इमानदार नाही का?.पैसा घेऊन मतदान करता?.काय म्हणावे तुम्हाला?. वेश्या सुद्धा शरीर विकतात ते पोटासाठी!. तुम्ही तर देश विकता,वर सांगता उमेदवार कुठ ५ वर्षे भेटतो आम्हाला?. अरे भेटत नसेल तर बदल ना त्याला मतदानातुन !. पैसे का मागता.मतदानाच्या दिवशी तर पैसे मिळत नाही तोपर्यंत काही मतदार मतदान करायलाही बाहेर पडत नाही. हे देशातील ९३ असंघटीत कष्टकरी मजूर कामगारांची मनस्थिति आहे. असंघटित कामगार म्हणून तुझी आणि तुझ्या देशाची ही जी अवस्था झाली त्याला तूच जबाबदार आहे. दुसरे कोणी नाही म्हणूनच हे उमेदवार एकदा निवडून आले की तुला कुत्र्यासारखी किंमत देतात आणि त्याचे तुला काहीच कसे वाटत नाही ?.

सुज्ञ व सजग मतदारांची संख्या ज्या दिवशी ७० टक्के होईल तेव्हाच अशा भ्रष्ट मतदारांचा पाडाव शक्य आहे.मतदारांच्या समुहाच राजकिय,सामाजिक,नैतिक प्रतिनीधीत्व जरूर मान्य करावं.पण उमेदवारांचा पैसा मतदारां पर्यंत पोहचवण्याची दलाली करणा–यांच्या पार्श्वभागावर ज्या दिवशी मतदार लाथ घालेल,त्या दिवशी देशात लोकशाही आहे हे मान्य करू व त्याच दिवशी मतदार हा खरा राजा असेल.अन्यथा तो लाचार गुलाम समजल्या जाणार आहे.

कायदेमंडळावर योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी आपणास मताचा अधिकार आहे.हा अधिकार फार महत्त्वाचा व मोठा आहे.तेव्हा आपल्या मताची बहुमोल शक्ती भलत्याच ठिकाणी वाया जाता नये.सध्या आपल्या देशात सधन लोक मते विकत घेतात,पण मत हि विकण्याची वस्तू नाही.ती आपली संरक्षणाची साधनशक्ती आहे.मत विकणे हा गुन्हा तर आहेच,पण तो आत्मघातकीपणा देखील आहे. मते विकून लायक नसलेल्या उमेदवारांची खोगीरभरती कायदेमंडळावर केल्याने देशाचे अपरिमित नुकसान होऊन राष्ट्र अधोगतीस जाते. स्वताः नालायक व अपात्र असून पैशाच्या जोरावर विधिमंडळात जाऊ इच्छिणारे काही लोक तुम्हाला द्रव्याचे अमिष दाखवतील. अशा कोणत्याही मोहास तुम्ही बळी पडू नका. मोहास बळी पडलात तर तुम्ही आपल्या पायावर पर्यायाने समाजाच्या पायावर धोंडा मारून घ्याल हि धोक्याची सूचना मी आज सर्वांना देत आहे. मते विकत मागणाऱ्या माणसाला समाजाचा पाठिंबा नसतो, म्हणून तर तो द्रव्याच्या बळावर आपली लायकी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो. अशा उमेद्वाराकडून समाजहिताची व राष्ट्रहिताची कार्ये होत नाहीत.पैसेवाला जर कायदे मंडळात गेला तर तो पैसेवाल्या लोकांचे हितसंरक्षण करील व तो सर्वसामान्य व गरिबांच्या हिताच्या आड येईल.म्हणून मत विकण्याचे पाप तुम्ही करू नका व आपली दिशाभूल करून घेऊ नका !! संदर्भ – डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ (१) पान नंबर ४६६)



महामानवाचे बोल असंघटित कष्टकरी मजूर,शेतमजूर,नाका कामगार,घरकामगार, हाताने कष्टकरणारा एकूण ९३ टक्के कामगार हा मतदार म्हणून राजकीय परिवर्तन करू शकतो. पण तो दररोजच्या मिळणाऱ्या मजुरी सारखी मजुरी मतदानच्या दिवशी मत विकुन मिळवणार असेल तर त्याची एका दिवसाची मजुरी किती होते ते जरा तपासून बघा?.समजा एका मताचे १००० रूपये × १८२५ दिवस (५ वर्ष) = ०.५४ रूपये एका दिवसाचे, जर कोणी एका मताचे २००० रूपये × १८२५ दिवस (५ वर्ष) = १.०९ रूपये एका दिवसाचे.एका मताचे ३००० रूपये × १८२५ दिवस (५ वर्ष) = १.६४ रुपये एका दिवसाचे,एका मताचे ४००० रूपये ×१८२५ दिवस (५ वर्ष) = २.१९ रुपये एका दिवसाचे,एका मताचे ५००० रूपये ×१८२५ दिवस (५ वर्ष) = २.७३ रुपये एका दिवसाचे होतात. हे एका मतदारांचे मतदान केल्यामुळे पाच वर्षाचे उत्पन्न झाले. तेच जर एका उमेदवाराचे पाच वर्षाचे वार्षिक उत्पन्न पाहाल तर डोके ठिकण्यावर आल्या शिवाय राहणार नाही. मत विकुन आपली आणि आपल्या कुटुंबाची किंमत कवडीमोल करू नका?.चला लोकशाही मजबुत करूया...योग्य उमेदवाराला मतदान करूया.कष्टकरी कामगारांच्या बाजूने उभा राहणारा.चरित्रवान,सामाजिक बांधिलकी ठेऊन वागणार, समाज हित,देश हिताला प्राधान्य देणारा उमेदवार त्यालाच मतदान करा. तो निवडून येणार नसेल तरी तुमच्या न्याय हक्क,अधिकारासाठी विचारधारेसाठी जनआंदोलन करणारा असला पाहिजे त्यालाच आपले बहुमूल्य मत दान करा,कारण एक मत परिवर्तन घडवू शकते हे लक्षात ठेवा.

----------

जय संविधान!. जय महाराष्ट्र!!. जय भारत!!!.

सागर रामभाऊ तायडे–९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

# प्रा.रमाकांत यादव सर आंबेडकरी चळवळीचे अभ्यासू शिलेदार..

आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ विचारवंत,मनस्वी मार्गदर्शक,इतिहासाचे गाढे अभ्यासक,सिध्दार्थ महाविद्यालयाचे उपप्राचार्य,बौद्धजन पंचायत समितीचे माजी सभापती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर कणकवली परिषद अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष,सिंपन प्रतिष्ठापन मुंबईचे सल्लागार,कुसूर विकास बौद्ध मंडळाचे जेष्ठ सल्लागार,सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बौद्ध समाजातील पहिले प्राध्यापक आणि आदर्श, संयमी,अजातशत्रू,प्रेरणादायी सुप्रसिध्द व्यक्तिमत्व ड.डॉ.प्रा.रमाकांत यादव सरांचे १८ नोव्हेंबर २०२० रोजी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दुःखद निधन झाले. त्यांच्या रुपांने आंबेडकरी चळवळीचे कृतिशील अभ्यासू शिलेदार,अष्टपैलू व्यक्तीमत्व कायस्वरुपी काळाच्या पडद्याआड गेले. यादव सर म्हणून ते सर्वत्र परिचित होते.

प्रा.रमाकांत यादव सरांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्हा,वैभववाडी तालुक्यातील कुसूर गांवी २३ मार्च १९३९ रोजी सर्वसामान्य कुटुंबात झाला.व्हिक्टोरिया गार्डन म्युनिसिपल स्कूलमध्ये प्राथमिक शिक्षण,आर.एम.भट हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण तर, सिध्दार्थ महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी मध्य रेल्वेमध्ये नोकरीला सुरुवात केली. सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय येथून एम.ए.(इतिहास व राज्यशास्त्र) एल.एल.बी.पदव्या संपादन करुन १९६८ पासून एल. यु.एम.व्ही.कॉलेज अंधेरी व नंतर सिध्दार्थ महाविद्यालयामध्ये अद्यपन सुरु केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड येथेही त्यांनी एम्.ए.चे वर्ग घेतले.सिध्दार्थ महाविद्यालयात त्यांनी इतिहास विभाग प्रमुख व उपप्राचार्य म्हणून जबाबदारी यशस्वी पार पाडून,तिथूनचं ते सेवानिवृत्तही झाले. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी कायद्याची (एल.एल.बी.) पदवी सुध्दा संपादन केली.सामाजिक,राजकीय चळवळीचा कोणताही कौटुंबिक वारसा नसतांना त्यांच्यातील सामाजिक अविष्कार आणि आंतरीक तळमळीमुळे ते आंबेडकरी चळवळीत ओढले गेले.

१९६८ साली कर्मवीर दादासाहेब गायकवाड व भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भारतीय बौद्ध महासभेच्या अखिल भारतीय बौध्द धम्म परिषदेत प्रा.रमाकांत यादव यांचा सहभाग होताचं पण,भैय्यासाहेबांनी १९७० साली भारतीय बौध्द महासभा रत्नागिरी जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती केली. १९७२ साली भैय्यासाहेबांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय बौध्द महासभेच्यावतीने कोलंबो श्रीलंका येथील जागतिक बौद्ध धम्म परिषदेला बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे,घनः श्याम तळवटकर, तत्कालीन आमदार सुमंतराव गायकवाड,भदंत शांतरक्षक व युवा प्रतिनिधी म्हणून प्रा. यादव सर उपस्थित होते. पुढे १९७४ साली घनःश्याम तळवटकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी बौद्धजन पंचायत समितीमध्ये प्रवेश केला आणि शिक्षण समिती चिटणीस पदापासून सर्वोच्च सभापती पदापर्यंत त्यांचा चढता प्रवास झाला.आंबेडकरी चळवळीतील योगदानाबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना अनेक पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले आणि यथोचित सत्कारही झाले.

धाम्मिक क्षेत्रात कार्यरत असतांनाही त्यांनी बॅ.राजाभाऊ खोब्रागडे यांच्या आर.पी.आय.रिपब्लिकन युवक संघटनेची मुंबई अध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळून, १९७८ साली ऐक्यवादी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने काँगेस आर.पी.आय. युतीचे पन्हाळा बावडा मतदार संघातून त्यांनी विधानसभेची निवडणूकही लढविली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे कोकण विभागाचे अध्यक्ष म्हणूनही ते कार्यरत होते.मात्र,प्रा.यादव सरांना वेगवेगळ्या पध्दतीने विरोध झाल्यांने त्यांचे नेतृत्व कोकणात लोकाभिमुख न होता मर्यादितचं राहिले. त्यामुळे,महाराष्ट्रात इतर जिल्ह्यांचा विचार करता कोकणात प्रा.रमाकांत यादव सरांचं नेतृत्व का स्विकारलं गेलं नाही किंवा कोकणात नविन नेतृत्व का उदयास येत नाही याची मनात नेहमीचं खंत आहे. कोकणातील आंबेडकरी चळवळ नेतृत्वा संदर्भात नक्कीचं गांभिर्याने विचार करेल अशी अपेक्षा नेहमीच असते.रमामाईनगर हत्याकांड,खैरलांजी भोतमांगे वंश संहार प्रकरण यासारख्या अन्याय अत्याचार प्रकरणी ते नेहमीचं आघाडीवर होते. रिडल्स प्रकरणात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समितीमध्येही त्यांचा सहभाग होता. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे व लिखाण प्रकाशन समितीवर सदस्य म्हणूनही त्यांनी कार्यभार सांभाळला.सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,आर्थिक क्षेत्रातही त्यांचा सहभाग होता. त्यांनी अनेक पदे,जबाबदाऱ्याही सांभाळून यशस्वी नेतृत्वही केले होते.

१९८७ साली प्रा. रमाकांत यादव सरांच्या माध्यमातूनचं सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऐतिहासिक सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे पहिले सुतोवाचं मिळाले.माहे ऑक्टो. १९८७ मध्ये बौद्धजन पंचायत समिती सभागृहात एका कार्यक्रमाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.त्या कार्यक्रमात त्यांनी कोकण पंचमहाल महार परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४/१५ मे १९३८ रोजी उपस्थित राहिलेल्या आठवणींना उजाळा देतांना,बाबासाहेबांनी अस्पृश्य बांधवांमध्ये जागृतीचा विस्तव प्रज्वलीत केला होता तो विस्तव विझू द्यायचा नाही तर तो सतत प्रज्वलीत राहिला पाहिजे म्हणून 'राजापूर ते गोवा' हद्दमधील जनतेच्यावतीने १९३८ च्या ऐतिहासिक घटनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करणे आवश्यक आहे असे सभागृहाला संबोधित करुन दिशाहीन समाजाला संघटीत केले. त्यानंतर, प्रा. नारायण वायंगणकर यांच्या अध्यक्षतेखाली,प्रमुख अतिथी म्हणून नाम. रा.सु.गवई, विशेष अतिथी म्हणून माजी केंद्रिय अर्थमंत्री प्रा.मधू दंडवते, पालकमंत्री प्रभू गांवकर,डॉ.भालचंद्र मुणगेकर,कवी शांताराम नांदगावकर,उर्मिलाताई पवार अशा अनेक मान्यवरांच्या उपस्थित सुवर्ण महोत्सव संपन्न केला. आणि त्याचं ऐतिहासिक परिषदेचा अमृत महोत्सव १३/१४ मे २०१३ रोजी कणकवली येथे अभुतपूर्व स्वरुपात प्रा.रमाकांत यादव यांच्या अध्यक्षतेखाली,रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर,नारायणराव राणे,तत्कालीन खासदार निलेश राणे यांच्या प्रमुख उपस्थित उत्साहात संपन्न झाला.

युगप्रवर्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतातच नव्हे तर जगात ज्या ज्या ठिकाणी गेले आहेत,त्या त्या ठिकाणी त्यांच्या अजरामर प्रेरणादायी स्मृती जतन करण्यासाठी स्मारके निर्माण झाली आहेत.बाबासाहेबांची जगाने नोंद घेतली. मात्र,सन १९३८ मध्ये बाबासाहेबांच्या उपस्थितीत जानवली नदीकाठी तत्कालीन महार समाजाची पहिली सामाजिक कोकण पंचमहाल महार परिषद संपन्न झाली त्या ठिकाणी आजतागायत एकही शिल्प किंवा चळवळीला प्रेरणा देणारे संशोधन केंद्र निर्माण झाले नव्हते.माहे ऑक्टोबर १९८७ मध्ये प्रा.यादव सरांनी कोकण पंचमहाल महार परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४/१५ मे १९३८ रोजी उपस्थित राहिलेल्या आठवणींना उजाळा दिला. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर कणकवली परिषदेच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख कार्यवाह प्रा.विजय जामसंडेकर उपस्थित जनसमुदायासमोर भावनोत्कट होऊन बोलतांना म्हणाले, बाबासाहेब जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांची स्मारके उभी राहिली.पण,बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कोकणभूमीत अर्थात कनकभूमीत एकही शिल्प आणि चळवळीला प्रेरणा देणारे संशोधन केंद्र अजून निर्माण झालेले नाही.म्हणूनच यापुढे,संघटनात्मक कार्यापेक्षा संस्थात्मक कार्याचा अंगीकार करावा. प्रा.यादव सर व प्रा.जामसंडेकर सरांच्या संकल्पनेतून तसेच काळाची गरज ओळखून व विधायक आणि रचनात्मक कार्य उभारणीसाठी कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांतून 'सिंपन प्रतिष्ठान' ही सेवाभावी संस्था उदयास आली. आणि त्याच सिंपन प्रतिष्ठानच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कनकभूमीत चळवळीला प्रेरणा देणारे शिल्प व संशोधन केंद्राची निर्मिती होत आहे. भावी पिढीला आणि चळवळीला ते नक्कीच प्रेरणा देईल. प्रा. यादव सरांनी सन १९३८ च्या आठवणींना उजाळा दिला नसता तर, त्या स्मृती पुस्तकांमध्येच कायमस्वरुपी बंदिस्त किंवा मर्यादित राहिल्या असत्या. सन २००७ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सामाजिक संस्थांच्यावतीने त्यांच्या अध्यक्षतेखाली सावंतवाडी येथे धम्मदिक्षा शतक महोत्सव संपन्न झाला. संगमेश्वर येथे त्यांच्या गाडीला अपघात होऊनही, सदर कार्यक्रमात ३५० लोकांना त्यांच्या माध्यमातून धम्मदिक्षा देण्यात आली. मात्र, त्यांच्या रुपांने कोकणातील आंबेडकरी चळवळीला दिशा देणारा निष्ठावंत दिशादर्शक, अभ्यासू शिलेदार हरपल्यांने, अशा आधारवडाची पोकळी भरुन निघणे फारचं अवघड आहे असे वाटते..

----------

**मिलिंद कांबळे चिंचवलकर**

९८९२४८५३४९,मुंबई.

## केज तालुक्यातील ऊस वाहतूक वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावा - दिनकर जाधव

### वाहतूक विभागाकडून जागृती आणि कार्यवाहीची आवश्यकता

केज । प्रतिनिधी- केज तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. दोन्ही कारखाने सुरु झाले आहे, ऊस उत्पादक शेतकर्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. पण रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या बहुतांश वाहनांच्यापाठीमागे रेडियम अथवा रिफ्लेक्टर लावलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कारखाना संचालक यांनी याची सक्ती करुन होणारे अपघात टाळण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी पत्रकाद्वारे केली आहे.



दिवसेंदिवस रोडवरील अपघातांची संख्या वाढत आहे. वाढती अपघाताची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची जनजागृती तसेच त्यावर विविध उपाययोजना होणे गरजेचे आहे. सद्या साखर कारखाने सुरु झाले आहेत. रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या वाहनांमुळे अनेक अपघात झालेली आहेत. या अपघातामध्ये अनेक निष्पाप बळी गेलेले आहेत. त्यामुळे साखर कारखानदार यांनी कारखान्यावर येणाऱ्या प्रत्येक ऊस वाहतूक वाहनांच्या मागे रेडियम, रिफ्लेक्टर लावणे सक्तीचे करावे. तसेच वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे पालन न करणार्या ऊस वाहतूक वाहनांवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकाने वाहतूकीच्या नियमाचे काटेकोटरपणे पालन करुन वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

## किनवट तालुक्यातील मजुराचे ऐन निवडणुकीच्या धामधुमीत कापूस वेचणीसाठी मजुराचे स्थलांतर





किनवट/शेख शौकत:-राज्यात सर्वत्र विधानसभानिवडणुकीची रणधुमाळी चालू असून निवडणुकीच्या तोंडावर किनवट तालुक्यातील मजुरांचे शेजारच्या राज्यात कापूस वेचणीसाठी स्थलांतर होत असल्याने मतदानाचा टक्का वाढविण्याचे मोठे आव्हान निवडणूक यंत्रणेसमोर आहे. किनवट तालुक्यात रोजगार निर्माण करणारा कुठलाही औद्योगिक प्रकल्प नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही परराज्यात रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते ही लाजिरवाणी बाव आहे. महाराष्ट्रातील किनवट हा आदिवासी अतिदुर्गम पूर्वी नक्षल प्रभावित भाग म्हणून ओळख असलेला आहे. तालुक्याचे नांदेडपासूनचे अंतर दीडशे किमी आहे. तालुक्यात कोणताही उद्योग, कारखाना अद्यापही उभारला गेला नाही. राजकीय नेत्यांच्या उदासीनतेमुळे रोजगार उपलब्ध होत नसल्याने हाताला काम नाही. शेतमालाला भाव नाही. मजुरासोबत काही अल्पभूधारक शेतकरी पोटाची खळगी भरण्यासाठी शोधात परप्रांतात स्थलांतर होतात हे दुर्दैव म्हणावे लागेल. तालुक्यात पूर्वी सूतगिरणी होती, त्याच्यातून एक मीटर सूत ही निघाले नाही, तो कारखाना उभा होण्यापूर्वीच पुढील बंद झाला. साखर कारखान्याचाही गाजावाजा झाला. त्याचे भूमिपूजनही झाले नाही. तालुक्यात कारखाने नाहीत. रोजगाराचे माध्यम नाही. स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली तरी सामान्य माणसे, शेतकरी, शेतमजुरांचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. पुढारी निवडणुकीत व्यस्त असून मजूर बांधव मात्र तेलंगणात कापूस वेचणीसाठी जात आहेत. तेलंगणात कापूस वेचनेचा दरही जास्त मिळतो हे त्याचे प्रमुख कारणही आहे.

किनवट शहरासह परिसरात मजूर वर्गाला काम नसल्याने हजारी मजूर तेलंगणात कापूस वेचणीसाठी जातात. सदर मजूर स्थलांतरामुळे मतदानाचा टक्का कमी होणार असल्याने यंत्रणा चिंतेत आहे. मजूर स्थलांतराचा फटका किनवट तालुका व परिसरातील शेतकऱ्यांना सुद्धा बसत असून त्यांना मजूर मिळणे कठीण होऊन बसले आहे. तसेच या स्थलांतरित मजुरांमुळे मतदानाचा टक्काही घसरवा नाही म्हणून प्रशासन काय उपाययोजना करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान !

## सहाही मतदारसंघातील मतदान पथके रवाना ; सकाळी ७ पासून होणार मतदानाला सुरुवात

लातूर, दि. १९ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज, २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. यासाठी २ हजार १४३ मतदान केंद्रांवर नियुक्त मतदान पथके रवाना झाली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर शहर आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या मतदान साहित्य वाटप केंद्रांना भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, लातूर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्यावर सर्वात मोठी जबाबदारी असून मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी या अधिकारी, कर्मचारी यांनी काळजीपूर्वक काम करावे. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे पालन करून संपूर्ण मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि निःपक्षपातीपणे पार पाडावी, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या. यावेळी त्यांनी मतदान पथकातील अधिकारी, कमर्चारी यांच्याशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. मतदानासाठी प्रशासनाची पूर्ण तयारी झाली असून जास्तीत जास्त मतदान होईल, यासाठी मतदारांनी बाहेर पडून मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदान पथकांना आणि पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन येथे लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदान पथकांना मतदान साहित्य वितरीत करण्यात आले. मतदान साहित्य प्राप्त करून घेतल्यानंतर ही पथके आपल्याला नेमून दिलेल्या मतदान केंद्राकडे रवाना झाली.

२० नोव्हेंबर जोंई सकाळी ७ पासून राष्ट्रीय कर्तव्यासाठी सज्ज असलेले झोनल अधिकारी, मतदानासाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी यांची शासकीय तंत्रनिकेतन येथे मतदान साहित्य हस्तगत करण्याची लगबग सुरु होती. मतदानासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनी आपले आदेश, मतदान केंद्राबाबत माहिती, ओळखपत्र हस्तगत करुन मतदान केंद्राचा मार्ग याबाबतची सर्व माहिती जाणून घेण्यासाठी लगबग दिसून आली. सर्व कर्मचारी मतदान साहित्य हस्तगत करुन त्या साहित्यांची तपासणी करुन मतदान केंद्राकडे रवाना झाले.

जिल्ह्यातील २ हजार १४२ मतदान केंद्र आणि १ सहाय्यकारी मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया होणार आहे. जिल्ह्यातील २० लाख ४५ हजार आपला मतदानाचा हक्क बजाविणार आहेत. त्यांना निर्भयपणे आणि शांततामय वातावरणात मतदान करता यावे, यासाठी पोलीस, गृहरक्षक दल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांच्या मदतीसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपलब्ध राहणार आहेत. तसेच प्रथमोपचार कीटसह एक आरोग्य कमर्चारी यांचीही मतदान केंद्रावर नियुक्ती करण्यात आली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सर्व मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, व्हीलचेअर, सावलीसाठी मंडप, वयोवृद्ध, गरोदर महिला यांना बसण्यासाठी खुर्ची यासारख्या किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सहाही विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी एक युवा संचलित मतदान केंद्र, दिव्यांग संचलित मतदान केंद्र, महिला संचलित मतदान केंद्र तयार करण्यात आले आहे. यासोबत प्रत्येक मतदारसंघात एक अभिनव मतदान केंद्र (युनिक पोलिंग स्टेशन) तयार करण्यात आले आहे. वयोवृद्ध मतदार, गरोदर महिला यांना रांगेत उभे न करता प्रथम प्राधान्याने प्रवेश देवून त्यांचे मतदान करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. निवडणूक, मतदानविषयक तक्रारींसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून या कक्षाचा संपर्क क्रमांक ०२३८२-२२४४७७ आहे.

**मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून १२ कागदपत्रे ग्राह्य धरणार**

मतदारांनी मतदानासाठी येताना भारत निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र सोबत आणावे. मतदान ओळखपत्राशिवाय आणखी १२ कागदपत्रे ग्राह्य धरण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक अथवा पोस्ट ऑफीसने जारी केलेले छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र अथवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक उपक्रम अथवा पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदारांना अथवा आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र आदी ओळखपत्रांचा समावेश आहे.

**मतदान केंद्र परिसरात मोबाईल वापरावर बंदी**

विधानसभा निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यात ज्या ठिकाणी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे, त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने उभारणे, तसेच मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेंजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यास तसेच निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन व निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंध करण्यात आला आहे.

**मतदान, मतमोजणीदिवशी मद्यविक्री राहणार बंद**

लातूर जिल्ह्यात मतदान कालावधी संपण्याच्या ४८ तास अगोदरपासून ते मतदान संपेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी संपेपर्यंत जिल्ह्यातील मद्यविक्री पूर्णत: बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी दिले आहेत. निवडणूक कालावधीत मतदान संपण्याच्या वेळेपूर्वी ४८ तासापासून म्हणजेच १८ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या सायंकाळी ६ वाजेपासून, मतदानापूर्वीचा एक दिवस म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पूर्ण दिवस आणि २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहील. तसेच मतमोजणी निमित्त २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहणार आहे.

**राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर; कामगारांना मिळणार एका दिवशीची सुट्टी अथवा सवलत**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होत आहे. मतदानासाठी कामगारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत राज्य शासनाने ७ नोव्हेंबर २०२४ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. कामगारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा, यासाठी मतदान होत असलेल्या क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना, ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच राज्य शासनाने २० नोव्हेंबर २०२४ रोजी राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये सार्वजिक सुट्टी जाहीर केली आहे. केंद्र शासनाची शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका इत्यादींना ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### रोटरीच्या अन्नपूर्णा योजनेसाठी 'मंगल निधी'

## कन्येच्या विवाहात वधुपित्याचा अनोखा पायंडा ५ संस्थांचा केला गौरव

लातूर/प्रतिनिधी: लातूर येथील व्यवसायिक रवी जोशी यांनी आपल्या कन्येच्या विवाहानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ५ संस्थांचा प्रत्येकी २१ हजार रुपयांचा 'मंगल निधी' देऊन गौरव केला.यात रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या अन्नपूर्णा योजनेचा समावेश आहे.

शहरातील भारतीय पुस्तकालयाचे मालक रवी जोशी यांच्या कन्येचा विवाह रविवार दि.१७ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला.स्वतः रोटरीचे सदस्य असणाऱ्या जोशी यांनी या विवाहात आहेर किंवा उपहार स्वीकारले नाहीत.उलट कन्यादान करताना सामाजिक संस्थांचाही गौरव करण्याचा अनोखा पायंडा त्यांनी सुरू केला.विवाहानिमित्त विविध कारणांनी लाखो रुपयांचा खर्च होतो.त्याऐवजी संस्थांना मदत केली तर समाजकार्याला बळ मिळू शकते.ज्या संस्था खरोखर असे उपक्रम राबवत आहेत त्यांना आपले उपक्रम आणखी वाढवता येऊ शकतात,असा विचार करत त्यांनी हा 'मंगल निधी' सुपूर्द केला.

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने मागील ४ वर्षांपासून रोटरी अन्नपूर्णा योजना राबवली जाते.या अंतर्गत ज्यांना कोणीही नाही,दोन वेळचे अन्नही ज्यांना मिळू शकत नाही अशा व्यक्तींना घरपोच जेवणाचा डबा दिला जातो. दानशुरांच्या सहकार्यातून मागील ४ वर्ष अखंडपणे हा उपक्रम सुरू आहे. रवी जोशी हे देखील रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे सदस्य आहेत.त्यामुळे या योजनेत स्वतःचा समर्पक सहभाग त्यांनी या माध्यमातून नोंदवला.यावेळी इतरही चार संस्थांना त्यांनी 'मंगल निधी' सुपूर्द केला.याबद्दल रोटरी अन्नपूर्णा योजनेचे चेअरमन शशिकांत मोरलावार, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे चेअरमन चेतन पंढरीकर,सचिव गिरीश पेन्सलवार यांच्यासह सर्व सदस्यांनी रवी जोशी यांचे आभार मानले.समाजाला दिशादर्शक ठरणारा उपक्रम राबवल्याबद्दल रोटरी परिवाराच्या वतीने त्यांचे कौतुकही करण्यात आले. जोशी यांच्याप्रमाणेच इतरांनीही विविध संस्थांना मदतीचा हात द्यावा.यातून आपण काहीतरी सत्कर्म केल्याचा,समाजकार्य करण्याचा अनोखा पॅटर्न घडवता येऊ शकतो,असे मत त्यांनी व्यक्त केले.

## विनोद तावडे निष्कलंक; आम्ही सत्य उघड करू : चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर : भाजप नेते विनोद तावडे निष्कलंक आहेत. त्यांच्यावर आज जे आरोप झाले ते चुकीचे आहेत. तपास यंत्रणा याचा तपास करेल पण भारतीय जनता पक्ष म्हणून आम्ही या षडयंत्राचा पर्दाफाश करू, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज (दि.१९) माध्यमांशी बोलताना दिली.



भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे हे नालासोपारा, वसई विरार भागात कार्यकर्त्यांनी निवडणुकीपूर्वी कसं काम करावं, मतदानाचा टक्का कसा वाढेल, बोगस मतदान कसे थांबवता येईल? याविषयी बैठक घेत असताना विरोधकांनी पैसे वाटल्याची खोटी माहिती पसरवली. विरोधकांचे हे पूर्वनियोजित षडयंत्र होते, असेही ते यावेळी म्हणाले.

विनोद तावडे हे कोट्यवधी रुपये घेऊन आले आहेत. ते पैसे वसई विरार आणि नालासोपारा भागात वाटणार आहेत, अशी विरोधकांनी एक फिल्म तयार केली. विनोद तावडे यांना षडयंत्रपूर्वक गोवण्यात आले. विनोद तावडे राष्ट्रीय महासचिव आहेत आणि त्या पदावर असलेली व्यक्ती अशा प्रकारे पैसे वाटप करतील का ? याचा विचार केला पाहिजे. खरे तर विरोधकांच्या पायाखालची जमीन घसरलेली आहे. निवडणुकीत यश मिळणार नाही, अशी भीती असल्यामुळे भारतीय जनता पक्ष आणि विनोद तावडे यांना बदनाम करण्याचा हा प्रकार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## सर्वोच्च न्यायालय, अलाहाबाद उच्च न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी



नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालय, प्रयागराज रेल्वे स्थानक, अलाहाबाद उच्च न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती निर्माण ट्रस्टचे अध्यक्ष आशुतोष पांडे आणि जन्मभूमी-शाही ईदगाह प्रकरणी खटला दाखल करणाऱ्या व्यक्तीच्या व्हॉट्सपवर धमकीचा संदेश आला आहे.

मंगळवारी, मथुरा श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयातही सुनावणी झाली. त्यापूर्वी सोमवारी रात्री उशीरा हा धमकीचा संदेश आला. आशुतोष पांडे यांनी दावा केला आहे की, हा धमकीचा संदेश पाकिस्तानातून आला आहे. सोमवारी, रात्री दीडच्या दरम्यान व्हॉट्सपवर पाकिस्तानी नंबरवरून ६ धमकीचे संदेश आले असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर २.३६ वाजता व्हॉट्सप कॉलद्वारे धमकी देण्यात आली. श्रीकृष्ण जन्मभूमी शाही ईदगाह प्रकरणात आशुतोष पक्षकार आहेत. ते श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती निर्माण ट्रस्टचे अध्यक्षही आहेत.

## 'कॅश फॉर वोट' प्रकरणावरुन राहुल गांधी, खर्गे यांचा पंतप्रधानांवर हल्लाबोल

नवी दिल्ली: महाराष्ट्रात मतदानाच्या आदल्यादिवशी 'कॅश फॉर वोट' प्रकरणामुळे राजकीय वर्तुळ ढवळून निघाले आहे. त्याचे पडसाद दिल्लीपर्यंत पोहोचले आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यापासून ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या प्रकरणाचा संबंध थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींशी जोडला आहे. हे ५ कोटी रुपये कोणाच्या सुरक्षेसाठी आहेत? जनतेचा पैसा लुटून तुम्हाला टेम्पोत कोणी पाठवला? असे सवाल राहुल गांधी यांनी केले आहेत.

भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांच्यावर विरारमधील एका हॉटेलमध्ये पाच कोटी रुपयांची रोकड लोकांना वाटत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर यांनी हॉटेलमध्ये गोंधळ घातला. या प्रकरणाचा व्हिडिओ समोर येताच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला. त्यांनी एक्सवर पोस्ट करुन या प्रकरणाचा समाचार घेतला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE